## प्रकरण चौथे

## संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि कार्यपद्धती


४•१ प्रस्तावना

४•२ गद्य पाठाचे आकलन

४•३ पद्य पाठाचे आकलन

४•५ मुलाखतसूची भरुन देणाऱ्या शिक्षकांची सर्वसाधारण माहिती

४•६ शिक्षकांची शैक्षणिक अर्हता

४•७ स मा रो प

# प्रकरण चौथे

## संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि कार्यपध्दती

### ४·१ प्रस्तावना :

या पूर्वीच्या प्रकरणात प्रकरण क्रमांक तीन मध्ये संशोधन कार्यपध्दतीचा आढावा घेतला. प्रस्तुत प्रकरणात करवीर तालुक्यातील शाळामधील मराठी विषयाच्या अध्यापनाच्या आजच्या स्थितीचा चिकित्सक अभ्यास करावयाचा असल्यामुळे विद्यार्थी व शिक्षकांच्या मुलाखतीतून प्राप्त झालेल्या माहितीचा उपयोग केला आहे.

प्रश्नावली व मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करुन अन्वयार्थ लावणे हे प्रस्तुत प्रकरणाचे उद्दिष्ट आहे.

यासाठी संशोधकाने करवीर तालुक्यातील प्राथमिक शाळेतील इ. १ली ते इ. ४थी च्या वर्गांना शिकविणाऱ्या अध्यापकांच्यासाठी प्रश्नावली तयार केली. (परिशिष्ट "ब" पहा) विद्यार्थ्यांच्यासाठीही प्रश्नावली तयार केली. (परिशिष्ट "अ" पहा)

वरील दोन्ही प्रश्नावलींच्याद्वारे मिळालेल्या संशोधन साहित्याचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करुन त्या संदर्भात अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

४.२ गद्य पाठाचे आकलन :

विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र. १ "शिकवलेला धडा समजतो का ? " हा द्विपर्यायी प्रश्न शिकविलेला धडा विद्यार्थ्यांना समजतो की नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र. ४.१

शिकविलेल्या धड्याच्या आकलनाविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १) | शिकविलेला धडा समजतो | १४० (८९.१७ %) | १७ (१०.८३ %) |
| | एकूण .. | १४० | १७ |

वरील सारणी वरुन असे स्पष्ट होते की, वर्गात शिकविलेला धडा एकूण १५७ मुलांपैकी १४० मुलांना (८९.१७ %) समजतो याचाच अर्थ असा की वर्गात शिकविलेल्या धड्याचे बहुतांशी मुलांना आकलन होते.

४•१ पद्यपाठाचे आकलन :

विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या मुलाखतसूची मधील प्रश्न क्र. २ : "शिकविलेली कविता समजते का ?" हा द्विपर्यायी प्रश्न आहे. शिकविलेली कविता विद्यार्थ्यांना समजते की नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. हा प्रश्न विचारण्याचे कारण असे की गद्यापेक्षा कवितेचे आकलन होणे कठीण असते. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४•२

शिकविलेल्या कवितेच्या आकलनाविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| २) | शिकविलेली कविता समजते का ? | १३० (८२•८ %) | २७ (१७•१९ %) |
| | एकूण .. | १३० (८२•८ %) | २७ (१७•१९ %) |

कविता ही गद्यापेक्षा आकलन होण्याच्या दृष्टीने कठीण असते. गद्याचे आकलन सहजासहजी होते. कवितेचे आकलन सहजासहजी होत नाही. मात्र वरील सारणी वरुन असे स्पष्ट होते की, वर्गात शिकविलेली कविता एकूण १५७ मुलांपैकी १३० मुलांना (८२•८ %) समजते.

## ४·१ बालभारती या पुस्तकाची उपलब्धता :

विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या मुलाखतसूची मधील प्रश्न क्र. १ सर्वांच्या जवळ बालभारतीचे पाठयपुस्तक आहे का ? हा द्विपर्यायी प्रश्न विद्यार्थ्यांच्या जवळ बालभारती पाठयपुस्तक आहे की नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने विचारला होता. अध्यापनाच्या वेळी पाठ्यपुस्तक जवळ असेल तर अध्यापन सुलभ होते. यासाठी हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणी-मध्ये दिलेला आहे.

### सारणी क्र. ४·१

अध्यापन सुलभ होणेसाठी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १) | सर्वांच्या जवळ बालभारतीचे पाठयपुस्तक आहे का ? | १५७ | - | १०० % |
| | एकूण .. | १५७ | - | १०० % |

वरील सारणी वरून असे स्पष्ट होते की, वर्गातील १५७ (१०० टक्के) मुलांच्या जवळ पाठयपुस्तके उपलब्ध आहेत.

४.४ पाठाचे आकलन व वाचन :

विद्यार्थ्यांच्यासाठी तयार केलेल्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र.४ "पाठ्यपुस्तकातील धडे किती मुलांना येतात ?" हा प्रश्न किती मुलांना धडे समजतात हे जाणून घेण्याच्या उद्देशाने विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणी मध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४.४.

शिकविलेल्या धड्यांच्या आकलनाविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ४) | पाठ्यपुस्तकातील धडे | १४०<br>(८९.१७ %) | १७<br>(१०.८३ %) |
| | एकूण .. | १४०<br>(८९.१७%) | १७<br>(१०.८३ %) |

वरील सारणी वरून असे स्पष्ट होते की, वर्गात शिकविलेले धडे एकूण १५७ मुलांपैकी १४० मुलांना (८९.१७%) समजतात.

विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या मुलाखत सूचीनुसार संशोधिका कांही मुलांकडून धडे वाचून घेतात. विद्यार्थ्यांना प्रकट वाचन शुध्द, सुस्पष्ट वाचता येते किंवा नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने संशोधिका कांही मुलांकडून धडे वाचून घेतात. धडे वाचून घेण्याविषयी प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

विद्यार्थ्याला प्रकट वाचन समजून करता येते का ? प्रकट वाचनात शब्दांचे, वाक्यांचे उच्चार शुद्ध व सुस्पष्ट आहेत का हे पाहाता येते.

याबाबत संशोधिकेने निरीक्षण असे आहे की, संशोधिका एकूण विद्यार्थी १५७ पैकी १४० विद्यार्थ्यांचे वैयक्तिक वाचन घेतले. १४० विद्यार्थ्यांपैकी ९० विद्यार्थी योग्य गतीने (६४.३ %) सुस्पष्ट व शुद्ध वाचन करतात. ३० विद्यार्थी (२१.४ %) सावकाश, अडखळत वाचतात. व २० विद्यार्थी अक्षरे, शब्द जोडून वाचतात. या २० मुलांच्या वाचनात फारशी प्रगती झालेली नाही असे आढळून येते. यावरुन असे निष्कर्ष निघते की, १७.१९ % विद्यार्थ्यांना वाचन जमत नाही. ६४.३ % विद्यार्थ्यांना आकलनपूर्वक वाचन जमते. तसेच वाचन करतांना हे विद्यार्थी पूर्णविराम, स्वल्पविराव व अवतरण चिन्हे यांचा अर्थ समजून वाचन करतात.

## ४.५ कवितांचे आकलन व पाठांतर :

विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या मुलाखतीच्या सूचीमधील प्रश्न क्र.५ विद्यार्थ्यांना कविता पाठ होते का ? कविता आवडते का ? विद्यार्थी कवितेमध्ये अभिरुची घेतो का हे पाहण्यासाठी वरील प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिला आहे.

सारणी क्र. ४.५

कविता आकलनाविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ५) | तुम्हास कोणती कविता पाठ आहे ? | १५७ | - | १०० % |
| | एकूण .. | १५७ | - | १०० % |

वरील सारणीवरून स्पष्ट होते की, वर्गात शिकविलेल्या कविता एकूण १५७ मुलांपैकी १५७ मुलांना (१०० %) पाठ आहेत. विद्यार्थ्यांना कविता आवडतात ही आजची स्थिती आहे.

विद्यार्थ्यांच्यासाठी तयार केलेल्या मुलाखत सूची - संशोधिका विद्यार्थ्यांच्याकडून कविता म्हणून घेतात. विद्यार्थ्यांना कविता आवडते की नाही ? कवितेचा अर्थ समजतो की नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने संशोधिकेने काही मुलांकडून कविता वाचून घेतल्या.

पद्य पाठांचे आकलन व वाचन याचे निरीक्षण :

संशोधिकेने १५७ विद्यार्थ्यांच्याकडून पाठयपुस्तकातील कविता वाचन व तालबद्द म्हणून घेतले. सर्व विद्यार्थ्यांना कवितेमध्ये अभिरुची आहे. 50 टक्के विद्यार्थी अभिनययुक्त, हावभावयुक्त कविता तालासुरात

म्हणतात. ५० टक्के विद्यार्थी सरळ सुरात कविता म्हणतात.

यावरून असे निष्कर्ष निघतो की बहुतांशी विद्यार्थ्यांना कविता म्हणता येते.

४.६ लेखन :

विद्यार्थ्यांच्यासाठी तयार केलेल्या मुलाखत सूचीमध्ये प्रश्न क्र.६ "आई" या विषयावर ५ वाक्ये तयार करता येतील का ? विद्यार्थ्यांना स्वतः:च्या मनाने छोटी छोटी वाक्ये तयार करता येतात का ? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने विचारला होता.

वर्गातील १५७ मुलांपैकी १४० मुलांनी (८९.१७) "आई" या विषयावर छोटी छोटी वाक्ये तयार केली.

निरीक्षण :

लेखन कौशल्ये विषयी संशोधिका एकूण विद्यार्थी १५७ पैकी १४० विद्यार्थ्यांच्याकडून "आई" या विषयावर छोटी छोटी वाक्ये तयार करुन घेतले. एकूण विद्यार्थी १०० पैकी ९० विद्यार्थी "आई" या विषयावर स्वतः:च्या विचाराने छोटी छोटी वाक्ये समजून बरोबर व शुध्द लेखन करतात. यावरुन असे निष्कर्ष निघते की, ६४.३ % विद्यार्थी लेखन क्षमता प्राप्त केलेले आहेत. एकूण १४० विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थी (२१.४ %) "आई" या विषयावर छोटी वाक्ये लिहितात. पण त्यामध्ये फार चुका दिसून येतात. १४० विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थ्यांना (१४.२%) "आई" या विषयावर छोटी छोटी वाक्ये तयार करता येत नाहीत.

४.७ भाषण, संभाषण, कौशाल्य :

विद्यार्थ्यांच्यासाठी तयार केलेल्या मुलाखतसूची मधील प्रश्न क्र.६ "माझी शाळा" या विषयावर ५ वाक्ये तयार करता येतील का ? संभाषण कौशाल्ये आत्मसात झाले की नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने विचारला होता.

संशोधिकेचे निरीक्षण पुढीलप्रमाणे आहे. एकूण विद्यार्थी १५७ पैकी १४० विद्यार्थी (८९.१७ %) भाषण संभाषणात सहभाग होतात. १७ विद्यार्थी (१२.१ %) संभाषणात सहभाग घेत नाही. एकूण विद्यार्थी १४० पैकी १२० विद्यार्थी (७६.४ %) "माझी शाळा" या विषयावर ५ वाक्ये तयार करुन सुस्पष्ट सांगतात. एकूण विद्यार्थी १४० पैकी २७ विद्यार्थी (१७.१ %) "माझी शाळा" या विषयी अडखळत वाक्ये तयार करुन सांगतात. एकूण विद्यार्थी १४० पैकी १० विद्यार्थी (६.३ %) संभाषणात सहभाग घेत नाही.

४.२ करवीर तालुक्यातील प्राथमिक स्तरावरील मराठी विषयाच्या अध्यापनाच्या आजच्या स्थितीचा चिकित्सक अभ्यास - पृथ:करण शिक्षकांचा प्रतिसादाचे विश्लेषण :

इयत्ता १ली ते इयत्ता ४थी च्या वर्गांना मराठी विषय शिकविणाऱ्या अध्यापकांची मते जाणून घेण्यासाठी संशोधिकेने प्रश्नावली तयार केली. (परिशिष्ट "ब") सदर प्रश्नावली करवीर तालुक्यातील मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळेतील ३६ शिक्षकांना

देण्यात आली. प्रश्नावलीतील प्रश्नांना होय/नाही पर्याय देऊन बरोबर ( ✓ ) अशी खूण करावयास सांगितले. कांही प्रश्नावली उत्तरे लिहिण्यास मोकळी सोडली होती. प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या संशोधन साहित्याचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून त्या संदर्भात अन्वयार्थ येथे लावला आहे.

४.२.१ अध्यापक मुलाखत सूची मधील प्रश्न क्र.१ : प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "श्रवण" हे उद्दिष्ट किती प्रमाणात साध्य होते ? हा प्रश्न शिक्षकांना विचारण्याचा उद्देश असा की, कोणत्याही भाषा अध्यापनात श्रवणास फार महत्व आहे. हे उद्दिष्ट किती प्रमाणात साध्य झाले हे पाहण्यासाठी हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र. ४.२.१

प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे श्रवण हे उद्दिष्ट साध्य करणे विषयी

| अ.नं. | श्रेणी | प्रतिसाद | प्रतिसाद टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | फार मोठया प्रमाणात | १० | २७.७ |
| २) | मोठया प्रमाणात | १५ | ४१.६ |
| ३) | कमी प्रमाणात | ११ | ३०.५ |
| ४) | फार कमी प्रमाणात | - | - |
| ५) | अजिबात नाही. | - | - |
| | एकूण .. | ३६ | ९९.८ |

वरील सारणी वरुन असे स्पष्ट होते की, प्राथमि स्तरावरील प्रथम भाषेचे श्रवण हे उद्दिष्टे फार मोठया प्रमाणात साध्य होते असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ शिक्षकांपैकी १० शिक्षकांचे (२७.७) आहे. "श्रवण" हे "उद्दिष्ट" मोठया प्रमाणात साध्य होते असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ शिक्षकांपैकी १५ शिक्षकांचे (४१•६ %) आहे. "श्रवण" हे उद्दिष्ट कमी प्रमाणात साध्य होते असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ शिक्षकांपैकी ११ शिक्षकांचे (३०•५ %) आहे. "श्रवण" हे उद्दिष्ट फार कमी प्रमाणात साध्य होते असे मत व्यक्त करणारे एक ही शिक्षक नाही. त्याच प्रमाणे "श्रवण" हे उद्दिष्ट अजिबात साध्य होत नाही असे मत व्यक्त करणारे एकही शिक्षक नाही.

यावरुन असा निष्कर्ष निघतो की, प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "श्रवण" उद्दिष्ट बहुतांशी साध्य झाला आहे.

४•२•२ अध्यापक मुलाखत सूची मधील प्रश्न क्र. २ : "श्रवण" हे उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये कोणत्या अडचणी येतात ?

श्रवण व्यवस्थित झालेतर अध्यापन सुलभ होते. "श्रवण" उद्दिष्ट साध्य करतांना कोणत्या अडचणी येतात हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला शिक्षकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४.२.२

"श्रवण" उद्दिष्टे साध्य करीत असणाऱ्या येणाऱ्या अडचणी विषयी

| अ.नं. | श्रेणी | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | फार मोठया प्रमाणात | - | - |
| २) | मोठया प्रमाणात | - | - |
| ३) | कमी प्रमाणात | २० | ५५.५ |
| ४) | फार कमी प्रमाणात | १६ | ४४.४ |
| ५) | अजिबात नाही | - | - |
| | एकूण .. | ३६ | |

वरील सारणी वरुन असे स्पष्ट होते की, "श्रवण" हे उद्दिष्टे साध्य करीत असतांना येणाऱ्या अडचणी विषयी एकूण ३६ शिक्षकांपैकी काही शिक्षकांनी खालील प्रमाणे आपले मत व्यक्त केले आहे. "श्रवण" हे उद्दिष्टे साध्य करीत असतांना फार मोठया प्रमाणात येणाऱ्या अडचणी विषयी एकही शिक्षकाचे मत नाही. "श्रवण" उद्दिष्टे साध्य करीत असतांना मोठया प्रमाणात येणाऱ्या अडचणी विषयी ही एकही शिक्षकाचे मत नाही. कमी प्रमाणात "श्रवण" उद्दिष्ट साध्य होते असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ शिक्षकापैकी २० शिक्षकांचे (५५.५%) मत आहे. फार कमी प्रमाणात "श्रवण" उद्दिष्ट साध्य होते असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ शिक्षकापैकी १६ शिक्षकांचे (४४.४%) मत आहे.

यावरुन असे निष्कर्ष निघते की, "श्रवण" उद्दिष्ट साध्य करतांना कमी प्रमाणात अडचणी येतात. ही आजची स्थिती आहे.

४.२.३ अध्यापक मुलाखतसूची मधील प्रश्न क्र. ३ : त्या अडचणीवर आपण कशा प्रकारे मात करतो ? हा प्रश्न विचारण्याचे हेतु असा की, अध्यापक त्या अडचणीवर मात करु शकतात किंवा नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला शिक्षकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४.२.३

अध्यापनात येणा-या अडचणी विषयी

| अ.नं. | श्रेणी | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | फार मोठया प्रमाणात | १६ | १०० % |
| २) | मोठया प्रमाणात | - | - |
| ३) | कमी प्रमाणात | - | - |
| ४) | फार कमी प्रमाणात | - | - |
| ५) | अजिबात नाही | - | - |
| | एकुण ... | १६ | १०० % |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, "श्रवण" उद्दिष्ट साध्य करीत असतांना येणा-या अडचणीवर एकूण १६ शिक्षकापैकी १६ शिक्षक (१००%) मात करतात. ही आजची स्थिती आहे.

४.२.४ अध्यापकांसाठी तयार केलेल्या मुलाखत सूचीमधील प्रश्न क्र.४ : ऐकलेल्या मजकूराचा अर्थ विद्यार्थ्याला समजून येतो का ? हा द्विपर्यायी प्रश्न ऐकलेल्या मजकूराचा अर्थ विद्यार्थ्यांना समजतो की नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने विचारला होता. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणी मध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४.२.४

ऐकलेल्या मजकूराच्या आकलनाविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ४) | ऐकलेल्या मजकूराचा अर्थ विद्यार्थ्यांना समजून येतो का ? | २६ (७२.२ %) | १० (२७.७ %) |
| | एकूण .. | २६ (७२.२ %) | १० (२७.७ %) |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, ऐकलेल्या मजकूराचा अर्थ विद्यार्थ्याला समजून येतो असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ शिक्षकांपैकी २६ शिक्षकांचे (७२.२%) आहे. ही आजची स्थिती आहे.

४•२•५ अध्यापकासाठी तयार केलेल्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र•५ : गाणी, कविता, गोष्टी आवडीने ऐकतो का ? हा द्विपर्यायी प्रश्न विद्यार्थ्यांना गाणी, कविता, गोष्टी आवडीने ऐकतो का ? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला अध्यापकांचा प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र•४•२•५

गाणी, कविता, गोष्टी, विद्यार्थी
आवडीने ऐकतो

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ५) | गाणी, कविता, गोष्टी, आवडीने ऐकतो का ? | ३६<br>१०० % | - |
| | एकूण ... | ३६<br>१०० % | - |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांना गाणी, गोष्टी, कविता आवडीने ऐकतो. असे मत एकूण ३६ अध्यापकापैकी ३६ अध्यापकांचे (१०० %) आहे. ही आजची स्थिती आहे.

४.२.६ अध्यापकांसाठी तयार केलेल्या मुलाखतसूची मधील प्रश्न क्र.६ : "संभाषण" हे उद्दिष्ट किती प्रमाणात साध्य होते ? हा प्रश्न विद्यार्थ्यांना "संभाषण" कला अवगत आहे किंवा नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने विचारला होता. या प्रश्नाला अध्यापकांचा प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र. ४.२.६

"संभाषण" कला विद्यार्थ्यांना अवगत असणे विषयी

| अ.नं. | श्रेणी | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | फार मोठया प्रमाणात | ६ | १६.६ |
| २) | मोठया प्रमाणात | १४ | ३८.८ |
| ३) | कमी प्रमाणात | १० | २७.७ |
| ४) | फार कमी प्रमाणात | ६ | १६.६ |
| ५) | अजिबात नाही | - | - |
| | एकूण .. | ३६ | ९९.७ |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, "संभाषण" उद्दिष्ट फार मोठया प्रमाणात साध्य होते असे मत व्यक्त करणारे ३६ अध्यापकांपैकी ६ अध्यापकांचा (१६.६ %) चा आहे.

४•२•७ अध्यापकासाठी तयार केलेल्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र.७ "संभाषण" हे उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये कोणत्या अडचणी येतात ? हा प्रश्न विद्यार्थ्यांना "संभाषण" उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये कोणत्या अडचणी येतात हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला आहे.

सारणी क्र.४•२•७

"संभाषण" उद्दिष्ट सुलभ होणे विषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ७) | "संभाषण" उद्दिष्टे साध्य करण्यामध्ये कोणत्या अडचणी येतात ? | ३६<br>१०० % | - |
| | एकूण .. | ३६<br>१०० % | |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, "संभाषण" उद्दिष्टे साध्य करतांना पुष्कळ अडचणी येतात. असे मत व्यक्त करणारे ३६ अध्यापकांपैकी ३६ अध्यापकांचे (१०० %) आहे. ही आजची स्थिती आहे.

४·२·८ अध्यापकांच्यासाठी तयार केलेल्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र· ८ - त्या अडचणीवर आपण कशा प्रकारे मात करता ? "संभाषण" कला विद्यार्थ्यांना अवगत व्हावी. या उद्देशाने हा प्रश्न विचारला आहे. या प्रश्नाला अध्यापकांचा प्रतिसाद पुढील सारणी-मध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४·२·८

" संभाषण " उद्दिष्ट अवगत होणेविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ८) | त्या अडचणीवर आपण कशा प्रकारे मात करता ? | २६<br>७२·२ % | १०<br>२७·७ % |
| | एकूण ·· | २६<br>७२·२ % | १०<br>२७·७ % |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांना "संभाषण" उद्दिष्ट साध्य करण्यासाठी येणाऱ्या अडचणीवर मात करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी २६ अध्यापक (७२·२%) आहेत. ही आजची स्थिती आहे.

४·२·९ अध्यापकासाठी तयार केलेल्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र.९ - शब्दांचे उच्चार योग्य प्रकारे करतो का ? हा विपर्यायी प्रश्न शब्दांचे उच्चार योग्य प्रकारे करतो किंवा नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला अध्यापकांचा प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र · ४·२·९

शब्दांचे उच्चार योग्य होणे विषयी

| अ·नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १) | शब्दांचे उच्चार योग्य प्रकारे करतो का ? | २४<br>६६·६· % | १२<br>३३·३ % |
| | एकूण ·· | २४<br>६६·६ % | १२<br>३३·३ % |

वरील सारणी वरुन असे स्पष्ट होते की, विद्यार्थी शब्दांचे उच्चार योग्य प्रकारे करतो असे मत व्यक्त करणारे एकूण अध्यापक ३६ पैकी २४ अध्यापकांचे (६६·६ %) आहे. ही आजची स्थिती आहे.

४•२•११ अध्यापकासाठी तयार केलेल्या मुलाखत सूचीमधील प्रश्न क्र•१० विचारलेल्या प्रश्नांना योग्य उत्तरे देतो काय ? हा विपर्यायी प्रश्न विद्यार्थ्यांना प्रश्नांची योग्य उत्तरे देता येते किंवा नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला अध्यापकांचा प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र•४•२•१०

विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे देण्याविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १०) | विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे देतो काय ? | २८<br>७७•७ % | ८<br>२२•२ % |
| | एकूण ... | ७७•७• % | २२•२ % |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, विद्यार्थी विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे देतो असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकापैकी २८ अध्यापकाचे (७७•७ %) आहे. ही आजची स्थिती आहे.

४•२•११ अध्यापकांसाठी तयार केलेल्या मुलाखत सूचीमधील प्रश्न क्र.११ - सहजपणे संभाषणात भाग घेतो का ? हा विषयीचा प्रश्न विद्यार्थी संभाषणात सहजपणे भाग घेतो किंवा नाही. हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र• ४•२•११

विद्यार्थी "संभाषणात" सहजपणे भाग घेणे विषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ११) | सहजपणे "संभाषणात" भाग घेतो का ? | २८ (७७•७ %) | ८ (२२•२ %) |
| | एकूण •• | २८ (७७•७ %) | ८ (२२•२ %) |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, विद्यार्थी "संभाषणात" सहजपणे भाग घेतो असे मत व्यक्त करणारे एकूण अध्यापक ३६ पैकी २८ अध्यापकांचे (७७.७ %) आहे. ही आजची स्थिती आहे.

४.२.१२ अध्यापकांसाठी तयार केलेल्या मुलाखत सूचीमधील प्रश्न क्र.१२ - गोष्ट अभिनय करुन सांगतो का ? हा द्विपर्यायी प्रश्न विद्यार्थ्यांना गोष्ट अभिनय युक्त सांगण्यास आवडते किंवा नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेले अध्यापकांचा प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४.२.१२

गोष्ट अभिनययुक्त सांगणे विषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १२) | गोष्ट अभिनययुक्त सांगतो का ? | २२<br>६१.१ % | १४<br>३८.८ % |
| | एकूण .. | २२<br>६१.१ % | १४<br>३८.८ % |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, विद्यार्थी अभिनययुक्त गोष्ट सांगतो असे एकूण अध्यापक ३६ पैकी २२ अध्यापकांचे (६१.१ %) मत आहे. ही आजची स्थिती आहे.

यावरुन निष्कर्ष असा निघतो की, ३८.८ % अध्यापकांचे मत असे आहे की विद्यार्थी लाजाळू असतात. अभिनय करण्यास लाजतात. कांही विद्यार्थी भित्रे स्वभावाचे असतात. अभिनय करण्यास घाबरतात.

४•२•१३ अध्यापक मुलाखत सूची मधील प्रश्न क्र• १३ - नाटयीकरणात भाग घेतो का ? हा द्विपर्यायी प्रश्न विद्यार्थ्यांना नाटयीकरणाची आवड आहे किंवा नाही हे जाणून घेण्याविषयी विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला अध्यापकांचा प्रतिसाद पुढील सारणी मध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४•२•१३

विद्यार्थी नाटयीकरणात भाग घेण्याविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १३) | नाटयीकरणात भाग घेतो का ? | २२<br>६१•१ ％ | १४<br>३८•८ ％ |
| | एकूण •• | ६१•१ ％<br>२२ | ३८•८ ％<br>१४ |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, विद्यार्थी नाटयीकरणात भाग घेतो असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी २२ अध्यापकांचे (६१•१ ％) आहे. ३८•८ ％ अध्यापकांचे मत असे आहे की काही विद्यार्थी लाजाळू, भित्रे स्वभावाचे असतात. त्यामुळे ते नाटयीकरणात भाग घेत नाहीत. ही आजची स्थिती आहे.

४•२•१४ अध्यापकांच्यासाठी तयार केलेल्या मुलाखत सूचीमधील प्रश्न क्र.१४ - प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "वाचन" हे उद्दिष्ट किंती प्रमाणात साध्य होते ? हा प्रश्न विद्यार्थ्यांना किती प्रमाणात - फार मोठया प्रमाणात, मोठया प्रमाणात, फार कमी प्रमाणात, कमी प्रमाणात, अजिबात नाही हे जाणून घेण्याच्या उददेशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणी मध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४•२•१४

"वाचन" उद्दिष्ट किती प्रमाणात साध्य होते या विषयी

| अ.नं. | श्रेणी | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | फार मोठया प्रमाणात | १८ | ५०•० % |
| २) | मोठया प्रमाणात | १० | २७•७ % |
| ३) | कमी प्रमाणात | - | २२•२ % |
| ४) | फार कमी प्र माणात | - | - |
| ५) | अजिबात नाही | - | - |
| | एकूण •• | ३६ | ९९•९ % |

वरील सारणी वरुन असे स्पष्ट होते की, प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "वाचन" हे उद्दिष्ट फार मोठया प्रमाणात साध्य होते असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी १८ अध्यापकांचे (५० %) आहे.

प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "वाचन" हे उद्दिष्ट मोठया प्रमाणात साध्य होते असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी १० अध्यापकांचे (२७·७ %) आहे.

प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "वाचन" हे उद्दिष्ट कमी प्रमाणात साध्य होते· असे मत एकूण ३६ अध्यापकांपैकी ८ अध्यापकांचे (२२·२ %) आहे.

प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "वाचन" हे उद्दिष्ट फार कमी प्रमाणात साध्य होते. असे मत एकाही अध्यापकाचे नाही.

प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "वाचन" हे उद्दिष्ट अजिबात साध्य होत नाही असे मत (0 %) आहे.

यावरुन निष्कर्ष असे काढता येईल की प्राथमिक स्तरावरील "वाचन" हे उद्दिष्ट बहुतांशी साध्य होते. ही आजची स्थिती आहे.

४·२·१५ अध्यापकांच्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र.१५ - "वाचन" हे उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये कोणत्या समस्या येतात ? हा प्रश्न विचारण्याचे उद्देश एकच आहे की, प्रत्येक विद्यार्थ्याला वाचन क्षमता प्राप्त झालीच पाहिजे. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

## सारणी क्र.४•२•१६

वाचन क्षमता विषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १५) | "वाचन" हे उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये कोणत्या अडचणी येतात ? | २६<br>७२•२ % | १०<br>२७•७ % |
| | एकूण •• | २६<br>७२•२ % | १०<br>२७•७ % |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, "वाचन" हे उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये अनेक अडचणी येतात असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी २६ अध्यापकांचे (७२•२ %) मत आहे. ही आजची स्थिती आहे.

४•२•१६ अध्यापकांच्यासाठी तयार केलेल्या मुलाखतसूची मधील प्रश्न क्र• १६ - या समस्यांवर आपण कशाप्रकारे मात करता ? विद्यार्थ्यांना "वाचन" क्षमता प्राप्त व्हावी. या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला अध्यापकांचा प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४.२.१६

वाचन क्षमता विषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १६) | या समस्येवर आपण कशा प्रकारे मात करता ? | २८<br>७७.७% | ८<br>२२.२ % |
| | एकूण .. | २८<br>७७.७ % | ८<br>२२.२ % |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, "वाचन" हे उद्दिष्ट साध्य करतांना अनेक समस्या येतात. त्यांच्यावर योग्य ते उपाय योजना करुन समस्यावर मात करता येतात असे मत एकूण ३६ अध्यापकांपैकी २८ अध्यापकांचे (७७.७ %) आहे.

४.२.१७ अध्यापकांच्या मुलाखतसूचीमधील प्रश्न क्र. १७ - विद्यार्थी धडा सलगपणे वाचतो का ? हा द्विपर्यायी प्रश्न विद्यार्थी धडा सलगपणे वाचतो किंवा नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने विचारला आहे. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४.२.१७

विद्यार्थी धडा सलगपणे वाचणेविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १७) | विद्यार्थी धडा सलगपणे वाचतो का ? | २७<br>७५ % | ९<br>२५ % |
| | एकूण | २७ (७५%) | ९ (२५%) |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, विद्यार्थी धडा सलगपणे वाचतो असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापका पैकी २७ अध्यापकांचे आहे. ही आजची स्थिती आहे.

४·२·१८ अध्यापकांच्या मुलाखतसूचीमधील प्रश्न क्र. १८ - विद्यार्थी धडा अर्थ समजून वाचतो का ? हा द्विपर्यायी प्रश्न आहे. विद्यार्थी धडा अर्थ समजून वाचतो किंवा नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४·२·१८

विद्यार्थी धडा अर्थ समजून वाचतो याविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १८) | विद्यार्थी धडा अर्थ समजून वाचतो का ? | २७<br>७५ % | ९<br>२५ % |
| | एकूण .. | २७<br>७५ % | ९<br>२५ % |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, विद्यार्थी धडा अर्थ समजून वाचतो असे मत प्रकट करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी २७ अध्यापकांचे (७५%) आहे. ही आजची स्थिती आहे.

४•२•१९ अध्यापकांच्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र.१९ – विद्यार्थी फळ्यावरील वाक्ये वाचतो का ? हा द्विपर्यायी प्रश्न विद्यार्थ्यास फळ्यावरील वाक्ये वाचता येते किंवा नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने विचारला गेला. या प्रश्नाला मिळणारा अध्यापकांचा प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र•४•२•१९

विद्यार्थी फळ्यावरील वाक्ये वाचण्याविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १९) | विद्यार्थी फळ्यावरील वाक्ये वाचतो का ? | २७<br>७५% | ९<br>२५% |
| | एकूण •• | २७<br>७५% | ९<br>२५% |

वरील सारणी वरुन असे स्पष्ट होते की, विद्यार्थी फळ्यावरील वाक्ये वाचतो असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी २७ अध्यापकांचे (७५•० %) आहे. ही आजची स्थिती आहे.

४•२•२० अध्यापकांच्या मुलाखत सूचीमधील प्रश्न क्र•२० – विद्यार्थी पाठ्यपुस्तकातील कविता, कथा, संवाद, इत्यादींचे वाचन करतो का ? हा द्विपर्यायी प्रश्न विद्यार्थी पाठ्यपुस्तकातील कथा, कविता, संवाद इत्यादींचे वाचन करतो किंवा नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला अध्यापकांचा प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे•

सारणी क्र•४•२•२०

विद्यार्थी पाठ्यपुस्तकातील कथा, कविता, संवाद इत्यादींचे वाचन करणे विषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| २०) | विद्यार्थी पाठ्यपुस्तकातील कथा, कविता, संवाद इत्यादींचे वाचन करतो का ? | २६<br>७२•२ % | १०<br>२७•७ % |
| | एकूण •• | २६<br>७२•२ % | १०<br>२७•७% |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, विद्यार्थी पाठ्यपुस्तकातील कथा, कविता, संवाद इत्यादींचे वाचन करतो असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी २६ अध्यापकांचे (७२•२ %) आहे.

यावरुन असे निष्कर्ष निघते की, २७•७% अध्यापकांचे मत असे आहे की विद्यार्थी पाठ्यपुस्तकातील कथा, कविता, संवाद इत्यादींचे वाचन करीत नाही.

४•२•२१ अध्यापकांच्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र• २१ -
छोटी बडबड गीते व बालगीत म्हणतो का ? हा द्विपर्यायी प्रश्न विद्यार्थ्यांना छोटी बडबडगीते व बालगीत म्हणण्याचा छंद आहे किंवा नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला अध्यापकांचा प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४•२•२१

बडबड गीते व बालगीतांच्या आवडी विषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| २१) | छोटी बडबडगीते व बालगीते म्हणतो का ? (पाठान्तर) | १६<br>१००% | - |
| | एकूण •• | १००% | |

वरील सारणीवरुन स्पष्ट होते की, विद्यार्थी बडबडगीते व बालगीते पाठान्तर करुन म्हणतात, असे मत व्यक्त करणारे एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापकांचे (१००%) आहे. ही आजची स्थिती आहे. विद्यार्थ्यांना बडबडगीते व बालगीते म्हणण्यास फार आवडते. बडबडगीत व बालगीतामध्ये विद्यार्थी रमतात.

४.२.२२ : अध्यापकांच्या मुलाखतसूचीमधील प्रश्न क्र.२२ -
प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "लेखन" हे उद्दिष्ट किती प्रमाणात साध्य होते ? हा प्रश्न शिक्षकांना विचारण्याचा उद्देश असा की कोणत्याही भाषा अध्यापनात "लेखनास" फार महत्व आहे. हे उद्दिष्ट किती प्रमाणात साध्य झाले हे जाणून घ्यावयाचे आहे. या प्रश्नाला शिक्षकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४.२.२२

"लेखन" कौशाल्य पाहण्यासाठी

| अ.नं. | श्रेणी | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | फार मोठया प्रमाणात | १८ | ५० % |
| २) | मोठया प्रमाणात | ९ | २५ % |
| ३) | फार कमी प्रमाणात | - | - |
| ४) | कमी प्रमाणात | ९ | २५ % |
| ५) | अजिबात नाही | - | - |
| | एकूण .. | ३६ | १००% |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषेचे "लेखन" हे उद्दिष्ट फार मोठया प्रमाणात साध्य होते असे

व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी १८ अध्यापकांचे (५०%) आहे.

"लेखन" उद्दिष्ट मोठया प्रमाणात साध्य म्हणणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी ९ अध्यापकांचे (२५%) आहे.

"लेखन" हे उद्दिष्ट कमी प्रमाणात साध्य होते असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी ९ अध्यापकांचे (२५%) आहे.

"लेखन" हे उद्दिष्ट फार कमी प्रमाणात साध्य होते असे एकही अध्यापक म्हणत नाही. तसेच "लेखन" हे उद्दिष्ट अजिबात साध्य होत नाही असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी एकही अध्यापक (० %) नाही.

यावरुन असे निष्कर्ष निघते की, "लेखन" उद्दिष्टे बहुतांशी साध्य होते. ही आजची स्थिती आहे.

४.२.२३ अध्यापकांच्या मुलाखत सूचीमधील प्रश्न क्र. २३ –
"लेखन" हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणत्या अडचणी येतात ? हा प्रश्न विचारण्याचा हेतु असा की, अध्यापनात "लेखन" उद्दिष्टाला फार महत्व आहे. हे उद्दिष्ट साध्य करतांना अध्यापकांना कोणत्या अडचणीयेतात हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४•२•२३

"लेखन" उद्दिष्ट साध्य करीत असतांना येणाऱ्या अडचणी विषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| २३ | "लेखन" हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणत्या अडचणी येतात ? | १६<br>१०० % | - |
| | एकूण •• | १६<br>१०० % | - |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, "लेखन" उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणत्या अडचणी येतात या बाबतीत १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापकांचे (१०० %) मत आहे की, अडचणी अनेक येतात. ही आजची स्थिती आहे.

४•२•२४ अध्यापकांच्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र.२४ –
या समस्यावर आपण कशा प्रकारे मात करतो ? हा प्रश्न विचारण्याचा हेतु असा की, भाषा अध्यापनात "लेखन" उद्दिष्ट अत्यंत महत्वाचे आहे. हे उद्दिष्ट यशस्वी करण्यासाठी अध्यापकांना शक्य होते किंवा नाही हे पाहण्यासाठी वरील प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४•२•२४

"लेखन" उद्दिष्ट सफल होणेविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही. |
|---|---|---|---|
| २४ | या समस्यावर आपण कशा प्रकारे मात करतो ? | १६<br>१००% | - |
| | एकूण •• | १००%<br>१६ | |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, "लेखन" उद्दिष्ट साध्य करण्यासाठी येणा-या अडचणीवर मात करता येते असे म्हणणारे एकूण १६ अध्यापकांपैकी १६ अध्यापक (१००%) आहेत. ही आजची स्थिती आहे.

४•२•२५ अध्यापकांच्या मुलाखतसूचीमधील प्रश्न क्र. २५ –
छोटी छोटी वाक्ये योग्य त्या गतीने लिहितो का ? हा द्विपर्यायी प्रश्न विचारण्याचा उद्देश असा आहे की, विद्यार्थी छोटी छोटी वाक्ये योग्य गतीने लिहितो किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी विचारला होता. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणी मध्ये दिलेला आहे.

सारणी क्र. ४.२.२५

छोटी छोटी वाक्ये योग्य गतीने लिहिण्याविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| २५ | छोटी छोटी वाक्ये योग्य गतीने लिहितो का ? | २७<br>७५ % | ९<br>२५ % |
| | एकूण .. | ७५ % | २५ % |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, विद्यार्थी छोटी छोटी वाक्ये योग्य गतीने लिहितो असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी २७ अध्यापकांचे (७५ %) आहे. ही आजची स्थिती आहे.

२४.२.२६ अध्यापकांच्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र. २६ – परिचित विषयावर व अनुभवावर आधारित वाक्य रचना लिहितो का ? हा द्विपर्यायी प्रश्न विचारण्याचा उद्देश असा की, विद्यार्थ्यांना परिसरातील वस्तु विषयी माहिती लिहिता येते किंवा नाही. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४.२.२६

परिचित विषयावर व अनुभवावर वाक्यरचना तयार करण्याविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| २६ | परिचित विषयावर व अनुभवावर आधारित वाक्यरचना लिहितो का ? | २७<br>७५ % | ९<br>२५ % |
| | एकूण ... | २७<br>७५ % | ९<br>२५ % |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, विद्यार्थी परिसरातील वस्तुविषयी वाक्य रचना तयार करून लिहितात असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी २७ अध्यापकांचे (७५ %) आहे. ही आजची स्थिती आहे.

४.२.२७ अध्यापकांच्या मुलाखतसूचीमधील प्रश्न क्र.२७ -
हस्ताक्षर वळणदार काढतो का ? हा द्विपर्यायी प्रश्न अध्यापकांना विचारण्याचा हेतु असा की, विद्यार्थी स्वतःचे हस्ताक्षर वळणदार, सफाईदारपणे काढतो किंवा नाही या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र. ४•२•२७

कळणादार हस्ताक्षराविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही. |
|---|---|---|---|
| २७) | "हस्ताक्षर" वळणादार काढतो का ? | २७<br>७५% | ९<br>२५% |
| | एकूण .. | २७<br>७५ % | ९<br>२५ % |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, विद्यार्थी वळणादार, सफाईदारपणे हस्ताक्षर काढतो असे मत व्यक्त करणारे ३६ अध्यापकांपैकी २७ (७५ %) अध्यापकांचे आहे. ही आजची स्थिती आहे.

४•२•२८ अध्यापकांच्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र. २९ - वाचलेल्या गोष्टींचा सारांश लिहितो का ? हा द्विपर्यायी प्रश्न विचारण्याचा हेतू असा की, विद्यार्थ्यांना वाचलेल्या गोष्टीचे आकलन झाले किंवा नाही या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

## सारणी क्र.४.२.२८

वाचलेल्या गोष्टींचे आकलनाविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| २८) | वाचलेल्या गोष्टींचा सारांश लिहितो का ? | २७<br>७५ % | ९<br>२५ % |
| | एकूण .. | २७<br>७५ % | ९<br>२५ % |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, एकूण ३६ अध्यापकांपैकी २७ अध्यापकांचे (७५ %) असे मत आहेकी, विद्यार्थी वाचलेल्या गोष्टींचा सारांश लिहितो. ही आजची स्थिती आहे.

४.२.२९ अध्यापकांच्या मुलाखत सूचीमधील प्रश्न क्र.२९ –
लेखनात विरामचिन्हांचा योग्य वापर करतो का ? हा द्विपर्यायी प्रश्न विचारण्याचा उद्देश असा की विद्यार्थी शुध्द लेखन लिहितात का ? विरामचिन्हांचा योग्य उपयोग करतात का ? या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४.२.२९

शुध्द लेखनाविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| २९ | लेखनात विरामचिन्हांचा योग्य वापर करतो का ? | २७<br>७५ % | ९<br>२५ % |
| | एकूण .. | २७<br>७५ % | ९<br>२५ % |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, लेखनात विरामचिन्हांचा योग्य वापर करतो असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी २७ (७५ %) अध्यापकांचे आहे. ही आजची स्थिती आहे.

४.२.३० अध्यापकांच्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र.३० -
लेखनात वाक्प्रचार व म्हणींचा उपयोग करतो का ? हा प्रश्न विचारण्याचा उद्देश असा की, विद्यार्थ्यांना वाक्प्रचार व म्हणी विषयी ज्ञान आहे किंवा नाही या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र. ४•२•१०

वाक्प्रचार व म्हणी विषयी ज्ञान असणे विषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १०) | लेखनात वाक्प्रचार व म्हणींचा उपयोग करतो का ? | २२<br>६१•१% | १४<br>३८•८% |
| | एकूण •• | २२<br>६१•१% | १४<br>३८.८% |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, लेखनात वाक्प्रचार व म्हणींचा उपयोग करतो असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकापैकी २२ अध्यापकांचे (६१•१%) आहे. ३८•८% अध्यापकांचे मत असे आहे की, विद्यार्थी लेखनात वाक्प्रचार व म्हणींची उपयोग करत नाहीत. ही आजची स्थिती आहे.

४•२•११ अध्यापकांच्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र. ११ –
मुले मराठी विषयाच्या अध्यापनात किती रुची दाखवितात ? हा प्रश्न विचारण्याचा हेतु असा की, मुलांना मराठी विषय आवडतो की नाही या प्रश्नाला अध्यापकांचे मिळालेले प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.२.११

मराठी विषयाची आवड असणे विषयी

| अ.नं. | श्रेणी | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | फार मोठया प्रमाणात | १८ | ५० % |
| २) | मोठया प्रमाणात | १८ | ५० % |
| ३) | कमी प्रमाणात | - | - |
| ४) | फार कमी प्रमाणात | - | - |
| ५) | अजिबात नाही | - | - |
| | एकूण .. | ३६ | १०० % |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, विद्यार्थी मराठी विषयाच्या अध्यापनात फार मोठया प्रमाणात रुचि दाखवितात असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी १८ अध्यापकांचे (५०%) आहे.

विद्यार्थी मराठी विषयाच्या अध्यापनात मोठया प्रमाणात रुचि दाखवितात असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी १८ अध्यापकांचे (५०%) आहे.

मराठी विषयाच्या अध्यापनात कमी प्रमाणात रुचि दाखवितात असे म्हणणारे ० % अध्यापक आहेत.

मराठी विषयाच्या अध्यापनात फार कमी प्रमाणात रुचि दाखवितात असे म्हणणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी एकही अध्यापक (0%) नाही.

मराठी विषयाच्या अध्यापनात अजिबात रुचि दाखवत नाही असे 0 % अध्यापकांचे मत आहे.

यावरुन असे निष्कर्ष निघते की, बहुतांशी विद्यार्थी मराठी विषयाच्या अध्यापनात रुचि दाखवितात, ही आजची स्थिती आहे.

४.२.३२ अध्यापकांच्या मुलाखत सूची मधील प्र.क्र. ३२ – मराठी विषयाच्या अध्यापन रुची दाखवत नसल्यास त्याची कारणे कोणती ? हा प्रश्न विचारण्याचा हेतु असा की, मुलांना मराठी विषयाच्या अध्यापनात किलपत गोडी आहे, हे समजण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीत दिलेला आहे.

सारणी क्र.४.२.३२

मराठी विषयाच्या अध्यापनात रुची असणेविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ३२) | मराठी विषयाच्या अध्यापनात रुची नसल्यास त्याची कारणे | 0 | ३६ |
| | कोणती ? | - | १00% |
| | एकूण .. | 0% | १00% |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्यापनात रुची असते. असे मत व्यक्त करणारे एकूण ३६ अध्यापकांपैकी ३६ अध्यापकांचे (१०० %) आहे. ही आजची स्थिती आहे.

४•२•३३ अध्यापकांच्या मुलाखतसूची मधील प्रश्न क्र.३३ - मराठी विषयाच्या अध्यापनात कोणकोणत्या शैक्षणिक उपक्रमांचा उपयोग करता ? हा प्रश्न विचारण्याचा हेतु असा की, मराठी विषयाचे अध्यापन प्रभावी परिणामकारक, आनंददायी व्हावे यासाठी शैक्षणिक उपक्रमांचा उपयोग करणे आवश्यक आहे. हे शैक्षणिक उपक्रमांचा अध्यापक उपयोग करतात की नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र•४•२•३३

मराठी विषयाचे अध्यापन प्रभावी होणेविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ३३) | मराठी विषयाच्या अध्यापनात कोणकोणत्या शैक्षणिक उपक्रमांचा उपयोग करता ? | ३६<br>१००% | - |
| | एकूण •• | १००% | - |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, १०० % अध्यापक मराठी विषयाचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी विविध शै. उपक्रमांचा आयोजन करतात. ही आजची स्थिती आहे.

४•२•१४ अध्यापकांच्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र. १४ -
मुलांचे शुध्द लेखन सुधारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात का ?
हा द्विपर्यायी प्रश्न विचारण्याचा हेतु असा की, विद्यार्थ्यांचा शुध्द लेखन सुधारण्यासाठी अध्यापक जाणीवपूर्वक कोणकोणते प्रयत्न करतात हे जाणून घेण्याच्या उद्देशाने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४•२•१४

मुलांचे शुध्दलेखनाविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १४) | मुलांचे शुध्दलेखन सुधारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात का ? | ३६<br>१००% | - |
| | एकूण | ३६<br>१००% | - |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, मुलांचे शुध्दलेखन सुधारण्यासाठी एकूण ३६ अध्यापकांपैकी ३६ (१००%) अध्यापक जाणीवपूर्वक प्रयत्न करतात. ही आजची स्थिती आहे.

४•२•३५ अध्यापकांच्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र. ३५ -
कोणते प्रयत्न केले जातात ? हा प्रश्न विचारण्याचा उद्देश असा की, अध्यापक मुलांचे शुध्द लेखन सुधारावे यासाठी जाणीवपूर्वक कोणकोणते प्रयत्न करतात. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणी मध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४•२•३५

शुध्द लेखनाविषयी केले जाणारे प्रयत्न

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ३५) | कोणते प्रयत्न केले जातात ? | ३६<br>१०० % | - |
| | एकूण .. | ३६<br>१०० % | |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, १००% अध्यापक शुध्द लेखनाविषयी जाणीवपूर्वक प्रयत्न करतात. ही आजची स्थिती आहे.

४•२•३६ अध्यापकांच्या मुलाखतसूची मधील प्र.क्र.३६ -
मुलाचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात का ? हा द्विपर्यायी प्रश्न विचारला आहे. मुलांचे हस्ताक्षर सुधारण्याविषयी जाणीवपूर्वक प्रश्न विचारला आहे. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र. ४.२.३६

मुलांचे हस्ताक्षर सुधारण्याविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ३६) | मुलांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात का ? | ३६<br>१००% | - |
| | एकूण .. | १००% | |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, मुलांचे हस्ताक्षर सुधारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात असे मत व्यक्त करणारे ३६ अध्यापकांपैकी ३६ (१००%) अध्यापकांचे आहे. ही आजची स्थिती आहे.

४.२.३७ अध्यापकांच्या मुलाखत सूची मधील प्रश्न क्र.३७ -
सर्व मुलांच्याकडे मराठीचे पाठयपुस्तक असते का ? हा प्रश्न विचारण्याचा हेतु असा की, सर्व मुलांच्याकडे मराठीचे पाठ्यपुस्तक जवळ असले की मराठीचे अध्यापन करणे सुलभ जाते. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

## सारणी क्र.४•२•१७

मराठीचे अध्यापन सुलभ होणेविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| १७ | सर्व विद्यार्थ्यांच्याकडे मराठीचे पाठ्यपुस्तक असते का ? | ३६<br>१००% | - |
| | एकूण •• | ३६<br>१००% | - |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, सर्व विद्यार्थ्यांच्या जवळ मराठीचे पाठ्यपुस्तक असते. त्यामुळे मराठीचे अध्यापन सुकर होते. असे मत एकूण ३६ अध्यापकांपैकी ३६ अध्यापकांचे (१००%) आहे. ही आजची स्थिती आहे.

४•२•१८ अध्यापकांच्या मुलाखत सूचीमधील प्रश्न क्र.१८ -
मराठी विषयाच्या अध्यापनात शैक्षणिक साधनांचा उपयोग करता का ? हा द्विपर्यायी प्रश्न विचारण्याचा उद्देश असा की अध्यापनात शैक्षणिक साधनांचा उपयोग केल्या अध्यापन प्रभावी व परिणामकारक होतो हे जाणून घेण्याच्या हेतुने हा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला अध्यापकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये केलेला आहे.

सारणी क्र.४•२•३८

अध्यापनात उपयोग करणे विषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ३८) | मराठी विषयाच्या अध्यापनात शैक्षणिक साधनांचा उपयोग करता का ? | ३६<br>१००% | - |
| | एकूण •• | ३६<br>१०० % | |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, अध्यापनात शैक्षणिक साधनांचा उपयोग एकूण ३६ अध्यापकापैकी ३६ अध्यापक (१००%) करतात. ही आजची स्थिती आहे.

४•२•३९ अध्यापकांच्या मुलाखत सूचीमधील प्रश्न क्र.३९ उपयोग करत असल्यास कोणकोणती शैक्षणिक साधने वापरता ? हा विचारण्याचा हेतु असा की अध्यापकांना शैक्षणिक साधनांची माहिती आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी•या प्रश्नाला मिळालेला अध्यापकांचा प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र.४•२•३९

शैक्षणिक साधनांच्या ज्ञानाविषयी

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ३९) | उपयोग करत असल्यास कोणा-कोणती साधने वापरता ? | ३६<br>१००% | - |
| | एकूण •• | १००% | |

वरील सारणीवरुन शैक्षणिक साधनांची माहिती १०० % अध्यापकांना आहे. ही आजची स्थिती आहे.

४.२.४० अध्यापकांच्या मुलाखत सूचीमधील प्रश्न क्र. ४० -
मराठी विषयाच्या अध्ययन अध्यापनासंबंधी या प्रबंधास उपयुक्त आलेली माहिती द्यावयाची असल्यास खाली सोडलेल्या जागेत थोडक्यात द्यावी
हा प्रश्न विचारण्याचा हेतु असा की, अध्यापकांना या संशोधनाविषयी नवीन ज्ञान द्यावयाचे आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये दिलेला आहे.

सारणी क्र. ४.२.४०

संशोधनाविषयी अधिक माहिती बाबत

| अ.नं. | प्रश्नांचा तपशील | होय | नाही |
|---|---|---|---|
| ४०) | मराठी विषयाच्या अध्यापनासंबंधीचा प्रबंधास उपयुक्त माहिती द्यावयाची असल्यास खाली सोडलेल्या जागेत थोडक्यात द्यावी. | ४<br>११.१% | ३२<br>८८.८% |
| | एकूण .. | ११.१% | ८८.८% |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, या प्रबंधास अधिक माहिती देण्याविषयी एकूण ३६ अध्यापकांपैकी ४ अध्यापकांचे (११.१%) आहे. ३२ अध्यापकांचे (८८.८%) प्रबंधास उपयुक्त माहिती देण्याचे विचार नाहीत.

४.५ प्रश्नावली भरुन देणा-या शिक्षकांची सर्वसाधारण माहिती व शैक्षणिक अर्हता -

इयत्ता १ली ते इयत्ता ४थी च्या वर्गांना अध्यापन करणा-या अध्यापकांची सर्वसाधारण माहिती प्रस्तुत संशोधनाला आवश्यक होती. ती मिळविण्याच्या हेतुने प्रश्न क्र. ४.२.१ ते ४.२.४० या संदर्भातील माहिती परिशिष्ट "ब" मध्ये नोंदविलेली आहे.

४.६ इयत्ता १ली ते इयत्ता ४थी च्या वर्गांना अध्यापन करणा-या अध्यापकांची शैक्षणिक अर्हता योग्य आहे का ते पाहण्यासाठी केलेली होती. अध्यापकांनी नोंदविलेली शैक्षणिक अर्हता पुढील सारणीमध्ये नमूद केली आहे.

सारणी क्र.४.६.१

अध्यापकांची शैक्षणिक अर्हतेनुसार वर्गवारी

| अ.नं. | शैक्षणिक अर्हता | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | बी.ए.,बी.एड्. | ३ | ८.३ |
| २) | एम्.ए. | १ | २.७ |
| ३) | बी.ए. | ७ | १९.४ |
| ४) | एस्.एस्.सी.,डी.एड्. | २५ | ६९.४ |
| | एकूण .. | ३६ | ९९.८ |

प्राथमिक स्तरावर अध्यापनासाठी शिक्षकांची शैक्षणिक अर्हता ही किमान एस्.एस्.सी., डी.एड्. मान्य करण्यात आलेली आहे. वरील सारणीमध्ये ३६ अध्यापकापैकी ३६ अध्यापक (१००%) एस्.एस्.सी.,डी.एड्. असल्याचे आढळते. काही अध्यापकांनी डी.एड्.नंतर स्वत:ची शैक्षणिक पात्रता वाढविली आहे. बी.ए.,बी.एड्. शैक्षणिक पात्रता असणारे एकूण ३६ अध्यापकापैकी ३ अध्यापक (८•३ %) आहेत. एम्.ए.शैक्षणिक पात्रता असणारे एकूण ३६ अध्यापकापैकी १ अध्यापक (२•७ %) आहे. बी.ए. शैक्षणिक पात्रता असणारे एकूण ३६ अध्यापकापैकी ७ अध्यापक (१९•४ %) आहेत. फक्त एस्.एस्.सी., डी.एड्. असणारे एकूण ३६ अध्यापकापैकी २५ अध्यापक (६९•४ %) आहेत. यावरुन असा अन्वयार्थ काढता येतो की, अध्यापकांनी अत्यावश्यक शैक्षणिक अर्हता ब-याच प्रमाणात प्राप्त केली आहे.

## ४•७ समारोप :

या प्रकरणामध्ये विद्यार्थ्यांना दिलेल्या मुलाखत सूची तसेच अध्यापकांची मुलाखत सूचीला मिळालेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण व विश्लेषण करून अन्वयार्थ लावण्यात आलेला आहे. पुढील प्रकरण पाच मध्ये या प्रकरणामध्ये लावलेल्या अन्वयार्थांच्या आधारे निष्कर्ष काढलेले आहेत आणि त्याच्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत.

.....

" विद्यार्थी शिक्षणपरायण असावा
शिक्षक विद्यार्थीपरायण असावा
दोघे ही ज्ञानपरायण असावे
आणि ज्ञान सेवापरायण असावे "

-- पूज्य विनोबा

(शिक्षणाची चतु:सूत्री)